म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा.क्र. 9236



# कांहींतरी नवेंच करा!

BVBK-0401236

वीरबाला झोपा

# वीर बाला झोया

••

वि. वा. हडप

••

पन्नास नये पैसे

म ... शाखा.
9236 दि: 20/5/61
वि. वा. वा.

BVBK-0401236

वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड
३, राउन्ड बिल्डिंग, मुंबई-२.



देशभक्ति आणि देशासाठीं आत्मबलिदान हीं कोणत्याहि देशांत घडोत, तीं स्मरणीय आणि अनुकरणीयच समजलीं पाहिजेत. झोया ही रशियाची एक वीरबाला होती. आक्रमकांशीं झुंज देतांना तिनें जें असामान्य धैर्य दाखविलें तें खऱ्या देशभक्तीला साजेसेंच होतें. भारतीय इतिहासांतहि अशीं चरित्रें अनेक झालेलीं आहेत.

★

श्री : १६६
✤

© वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि.
✤
प्रकाशक ।
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी,
पब्लिशर्स. प्रा. लि.
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रोड,
मुंबई २.
✤
आवृत्ति दुसरी :
१९६२
✤
मूल्य : ५० नये पैसे
✤
मुद्रक :
अनंत जे. शाह,
लिपिका प्रेस,
कुर्ला रोड, अंधेरी.

# वीरबाला झोया

त्या दिवशीं १९४१ सालच्या जूनची २२ तारीख होती. मॉस्कोच्या एका शाळेंतील मुलांची परीक्षा त्या दिवशीं सुरू होणार होती. त्या तयारीनें शिक्षकीण बाई ल्युबोव्ह टिमोफेयेव्हना सकाळीं शाळेंत गेल्या. परंतु जाऊन पाहतात तों त्यांचा वर्ग रिकामा. वर्गांत एकही मूल आढळेना. वर्गांतच नव्हे, शाळेंत इतर वर्गांतही मुलें जवळ जवळ हजर नव्हतींच म्हटलें तरी चालेल. बाईंना तो विचित्र प्रकार पाहून आश्चर्यही वाटलें, आणि मुलांचा कांहींसा रागही आला. आज परीक्षा सुरू व्हायची आणि मुलें शाळेंत हजर नाहींत याचा अर्थ काय ?

बाईंना शाळेंत येतांनाच साऱ्या शहरभर, साऱ्या नागरिकांच्या आणि मुलाबाळांच्याही चर्येवर उदासवाणा संताप सांवटल्यासारखा भास होत होता. तें त्यांनीं मनावर घेतलें नाहीं. परंतु शाळेंत येतांक्षणीं शाळा देखील ओस पडलेली जेव्हां आढळली, तेव्हां मात्र त्यांच्या मनाला हुरहुर वाटूं लागली.

"काय झालें आहे नकळे," असें मनांत म्हणत बाई शाळेच्या दरवाजांत येऊन उभ्या राहून पाहूं लागल्या.

तोंच बाईंची सत्रा वर्षांची मुलगी झोया सैरभैर झाल्यासारखी रस्त्यानें चालली होती, ती आईपाशीं येऊन सांगूं लागली, "लढाई सुरू झाली आई ! आपल्या देशांत लढाई आली."

"म्हणजे ?" आईनें गोंधळल्यासारखें विचारलें.

"जर्मनीनें युद्ध जाहीर न करतां कसानें गळा कापावा तसें आपल्या देशाच्या सरहद्दीच्या आंत लष्कर घुसवून युद्ध सुरू केलें." झोया उत्तरली.

तेवढ्यांत झोयाचा वडील भाऊ शुरा तिथें आला. त्यानें तें ऐकलें. झोयाच्या तोंडाकडे पाहिलें, तों ती अस्वस्थ झालेली दिसली.

"मला वाटतच होतें, जर्मनी आमच्याशीं युद्ध सुरू करणार असें." झोया म्हणाली.

"आतां तुझा आघाडीवर जायचा विचार आहे कीं काय ?" शुरानें बहिणीला घरीं आल्यावर विचारलें.

"होय. मी विचार करत्यें आहें." झोया त्रासलेल्या स्वरांत म्हणाली. आणि तशीच आपल्या खोलींत चालती झाली.

युद्ध म्हणजे लाखों लोकांचें मरण, देशाचा विध्वंस. लोकांच्या दुःखाला आणि यातनांना सीमा उरणार नाहीं. सत्रा वर्षांच्या सुजाण झोयाला हें कळत होतें. नाझी जर्मनी म्हणजे काय भयंकर प्रकरण आहे हें तिला कोणीं नव्यानें सांगायला नको होतें. ती उगीच अस्वस्थ झाली नव्हती.

आठवडा गेला. आणि एके दिवशीं सकाळीं दरवाजा-वर कुणी तरी ठोठावल्याचा आवाज ऐकूं आला.

"शुरा घरांत आहे का ? त्याची मला भेट घ्यायची आहे." बाहेरून बोललेलें ऐकूं आलें.

झोयानें तो आवाज ओळखला. शुराचा जिवलग मित्र पेटचा सिमोनोव्ह याचा तो आवाज होता.

"कशाला पाहिजे रे शुरा तुला ?" तिनें कांहींशा नाखुषीनें विचारलें. ते सोबती सोबती असेच घरीं येत. पण शुरापाशीं काय काम आहे हें विचारलें तरी तिला नीट सांगत नसत. म्हणून ती त्यांच्यावर चिडे.

तिची दांडगी इच्छा कीं, आपण आपल्या लोकांसाठीं, आपल्या देशासाठीं कांहींतरी खूप खूप चांगलें करावें. त्या-साठीं पडेल तो त्रास भोगायलाही ती नेहमीं एका पाया-वर तयार असे. अगदीं प्रथम हें दुसरें महायुद्ध पेटलें, आणि जेव्हां सोव्हिएट रशिया जर्मनीशीं तात्पुरतें राजकारणी संगनमत करून पोलंडमध्यें लढाईंत उतरला, तेव्हां देखील तिला वाटायचें कीं, आपले इतके सैनिक आपल्या मायदेशाचें भलें व्हावें म्हणून तळहातावर शिर घेऊन आघाडीला लढत आहेत. त्यांचींच लेकरें ना आम्हीं ? भावंडें त्यांचीं ? आम्ही शिकणारीं मुलें झालों म्हणून काय झालें ? करतां येईल त्या परीनें आम्हीं कंबर कसून त्यांचा पाठपुरावा करायला नको ?

अशा प्रकारें मुलांना देशाचे उत्तम व कर्तबगार नागरिक बनविण्यासाठीं देशांत तेव्हां अनेक चळवळी सुरू होत्या. त्यांतलीच एक यंग पायोनियर लीग होती. झोया त्या संस्थेंतली पहिल्या प्रतीची स्वयंसेविका होती. सुटींत तिनें आपला अभ्यास सांभाळून आजवर अशीं कितीतरी लोकोपयोगी कामें केलीं होतीं. इतक्या लहान वयांतही ती आणि तिचा भाऊ शुरा या दोघांनींही समाजसेवक-देशसेवक म्हणून चांगली वाहवा मिळविली होती.

आणि आतां आज तर काय! नाझी जर्मनी आपल्या मित्रावर-सोव्हिएट रशियावर सापासारखा उलटून त्याच्या काळजाचा चावा घ्यायला उठला होता. एकदम लढाई करून तिच्या मायदेशांत घुसला होता.

अशा वेळीं स्वस्थ बसणारी, शांत राहणारी मुलगी झोया नव्हती.

शुराच्या मित्राशीं ती रागाच्या भरांत सरळ बोललीच नाहीं. तेवढ्यांत शुराच तो आवाज ऐकून बाहेर आला. मित्र मित्र भेटले. पण ते तिथें कांहींच बोलले नाहींत. दोघेही हळूहळू कांहींतरी कानांत कुजबुजत बाहेर शाळे-कडे गेले.

दुपारीं बऱ्याच उशिरां शुरा माघारीं आला. झोयानें पाहिलें, तों तिला त्याची चर्या गंभीर व चिंतेंत गुरफटल्या-सारखी दिसत होती.

'काय एवढें खलबत चाललें होतें यांचें तिकडे एका बाजूला ?' असें मनांत म्हणत झोयानें त्याला विचारलें, "इतक्या गुप्त गोष्टी काय चालल्या होत्या रे तुमच्या ?"

"तें तुला सांगतां यायचें नाहीं." एवढेंच त्यावर भावानें बहिणीला तुटक उत्तर दिलें.

झोया अधिकच हिरमुसली झाली. त्या दिवशीं ती जास्त कांहीं बोलली नाहीं. मात्र दुसऱ्या दिवशीं उजाडतांच सगळ्यांच्या अगोदर शाळेकडे गेली. पण दुपारीं शाळेंतून माघारीं आली ती अगदीं बेचैन होऊन.

"हीं मुलें कामगिरीवर निघालीं आहेत ग आई !" ती आपल्या आईला म्हणाली, "पण ते आम्हां मुलींना कांहीं आपल्याबरोबर घ्यायला तयार नाहींत. मीं पुष्कळ सांगून पाहिलें त्यांना. अग, मला चांगला नेम धरतां येतो. माझी प्रकृतिही चांगली खणखणीत आहे. पण ते माझें कांहीं ऐकायलाच तयार नाहींत, तिथें काय करायचें ग ?"

आई त्यावर कांहीं बोलली नाहीं. फुलत्या कळी-सारखी आपल्या लेकरांविषयींच्या सार्थ अभिमानानें गालां-तल्या गालांत हंसली मात्र.

थोड्या वेळानें शुरा आला. आपण जसें कांहीं विशेष कांहींच करीत नाहीं इतक्या खेळकर सहजपणानें तो आईला म्हणाला, "आई ! मला माझे एकदोन मांडचोळणे बांधून दे कीं ग ! आणि थोडी शिदोरी. फार नको, थोडी."

आपण कुठें चाललों आहों हें त्याचें त्याला तरी माहीत होतें कीं नाहीं नकळे. पण घरांत तो तसें कांहींच बोलला नाहीं.

"अरे, तूं कुठें चाललास तें बोलत कां रे नाहींस शुरा ?" झोयानें वाढत्या उत्सुकतेनें त्याला विचारलें.

"वाः ! असें वारेमाप मनांतलें सांगत सुटलों मी, तर फार चांगला सैनिक होईन कीं आपल्या देशाचा !" तो कांहींशा निरागस आढ्यतेनें म्हणाला. त्यावर झोया तरी काय बोलणार ?

दुपारीं चार वाजायच्या सुमाराला मुलें गाड्यांतून आघाडीवर जायला निघालीं. त्यांना निरोप द्यायला ज्याच्या त्याच्या घरची मंडळी रस्त्यावरच्या ट्रामनाक्यावर जमली होती.

"अग ! आतां आमची गाडी भरली कीं जाऊं आम्हीं. तूं कशाला थांबतेस उगीच ? जा कीं घरीं आतां. मात्र आईची नीट काळजी घे हं !" शुरा झोयाला म्हणाला.

तेवढ्यांत गाडी आली. ती बहुतेक भरलेली होती. शुरा आंत बसला आणि गाडी चालू झाली.

'बहुतेक आघाडीवरच चाललीं असलीं पाहिजेत हीं मुलें. आणि मी ? मी मात्र लोळ्यागोळ्यासारखी हात जोडून घरांत बसूं ? कां ? मी मुलगी म्हणून ?' असें स्वतःच्या स्त्रीपणावर चिडून झोया घरीं आली.

त्याच दिवशीं संध्याकाळची गोष्ट. झोयाची आई थोडा वेळ विसावा घेत पहुडली होती. तोंच झोया अर्धवट कपडे केलेली, केस अर्धवट विंचरले आहेत अशी तिथें आली. ती आईला हलवीत म्हणाली, "आई ! ऊठ ऊठ ग लौकर."

"कां ग ? काय झालें ?" आईनें दचकून उठतां उठतां विचारलें.

"कांहीं झालें नाहीं आई ! आतां रेडिओवर कॉम्रेड स्टालिनचें भाषण आहे. ऐकायला ऊठ कीं !" असें झोयानें म्हणत घड्याळाकडे पाहून रेडिओ चालू केला.

"कॉम्रेड ! नागरिकांनो ! बंधु-भगिनींनो ! आमच्या सैन्यांतील आणि आरमारांतील सैनिकांनो ! मी तुमच्याशीं बोलतों आहें. माझ्या प्रिय मित्रांनो !......."

सोव्हिएट युनियनचा नेता स्टालिन बोलत होता.

"आपला देश मृत्यूच्या जबड्यांत सांपडला आहे. फासिस्ट जर्मनी हा आपला अत्यंत कावेबाज हाडवैरी आज आपल्यावर उलटला आहे..."

आपल्या ह्या शत्रूचा डाव काय आहे. नाझी जर्मनी आपली भूमि कशी बळकावूं पाहत आहे. आपल्या श्रमांचीं फळें हिरावून घेऊन आपल्या देशांत पुन्हा जमीनदारांचें बूड बळकट करण्यासाठीं कसकशा कारवाया चालल्या आहेत. सोव्हिएट युनियनमधील स्वतंत्र लोकांना पुन्हा गुलाम करण्याचा युद्धखोर नाझी जर्मनीचा हा राक्षसी

प्रयत्न कसा चालला आहे. अशा साऱ्या गोष्टींचें वर्णन करून स्टालिननें युद्धाची पार्श्वभूमि समजावून सांगितली.

शेवटीं तो म्हणाला, "याप्रमाणें आपल्या सोव्हिएट राष्ट्रापुढें आज जगावें कीं मरावें असा अतिशय गंभीर प्रश्न आ वासून उभा आहे. आपल्या सोव्हिएट युनियनमधील लोकांचें स्वराज्य अबाधित टिकवणार कीं आपण गुलाम होणार ? याची सोव्हिएटच्या जनतेला उमज पडली पाहिजे. त्यासाठीं युद्धजन्य परिस्थितीशीं मुकाबला कसा करायचा हें आपल्या साऱ्या प्रयत्नांचें एकच एक लक्ष्य असलें पाहिजे. आपल्या युद्ध आघाडीवरील हितसंबंधांपुढें इतर सारे हितसंबंध दुय्यम समजायला हवेत. आपली लाल सेना, लाल आरमार आणि सोव्हिएट युनियनचे सारे नागरिक यांनीं सोव्हिएट भूमीच्या इंचाइंचासाठीं जपलें पाहिजे, लढलें पाहिजे. आपलीं शहरें आणि खेडीं यांच्यासाठीं आपण आपल्या शरिरांतील शेवटचा रक्तबिंदु सांडेपावेतों लढण्याची पराकाष्ठा केली पाहिजे. जनतेचें सारें सामर्थ्य शत्रूला नेस्तनाबूत करण्यासाठीं एकवटून लढलें पाहिजे. आपलीं पावलें अंतिम विजयाच्या रोखानेंच पडलीं पाहिजेत...."

झोयाच्या राष्ट्राचा पुढारी संजीवनी मंत्र जपल्यासारखा आवेशानें जिवंत भाषेंत बोलत होता. आणि झोया लक्षपूर्वक कान टवकारून ऐकत होती.

"आई ! शुरानें हें भाषण ऐकलें असेल का ग ?" भाषण पूर्ण होतांच ती आईला म्हणाली.

असे दिवसामागून दिवस चालले होते. तों एके दिवशीं शुरा अकस्मात घरीं आला. तेव्हां घरांतली सर्व मंडळी गप्पागोष्टी करीत बसली होती. शुरा युद्धाच्या कामगार आघाडीवर काम करीत होता हें घरांत सर्वांना आतां माहीत झालें होतें. पण तो यावेळींही तसें आपण होऊन कांहीं बोलेना. तो फक्त एवढेंच म्हणाला, "अग ! मी सुखरूप माघारा येऊन भेटलों ना ? बस्स ! बाकीचें काय करायचें आहे आपणाला ? आणि खरोखर त्यांत सांगण्या-जोगें कांहीं नाहींही. आम्ही खूप खूप काम केलें. बस्स एवढेंच. मी आज घरीं आलों तो माझा वाढदिवस साजरा करायला. आज तारीख २७ जुलै. आठवते का ?"

त्या दिवशीं दुपारीं जेवायला बसतांना तो झोयाला हळूच म्हणाला, "झोया ! आपणांला दोघांनाही एक चांगलें काम करतां येण्याजोगें आहे. आपण बोरेटच्या कारखान्यांत टर्नरचें काम शिकायला उमेदवार म्हणून जाऊं या."

तें ऐकून झोयाला किती आनंद झाला म्हणून सांगावें ! तिला कांहींही करून देशासाठीं चांगलें कांहीं करण्यासाठीं घराबाहेर पडायला हवें होतें. तिला ती एक संधि मिळाली.

लगेच दुसऱ्या दिवशीं तीं दोन्ही मुलें टर्नरचें काम शिकायला कारखान्यांत जाऊन दाखल झालीं.

सुमारें दोन महिन्यांनीं झोया आणि शुरा दोघेंही, आई पाहते तों, घरीं हजर. त्यांना पाहून आईचा आनंद गगनांत सामावेना.

त्या दिवसभर जेवायला बसल्यावर देखील झोयाच्या आईपाशीं त्याच गोष्टी. लेक गंमती गंमती सांगत होती आणि आई आनंदानें ऐकत होती.

## २ : भिंतचित्रानें काय सांगितलें ?

जसजसे दिवस जात होते, तसतशी मॉस्कोची परिस्थिति अधिकाधिक गंभीर होत होती. शत्रूच्या विमानहल्ल्यापासून बचाव करण्यासाठीं नाना प्रकारच्या हिकमती लढविल्या जात होत्या. रस्त्यारस्त्यांतून लष्करी गस्त सुरू होती. रात्रीच्या वेळीं शहर काळोखांत अदृश्य होई. शत्रूला सुगावा लागेल या भयानें रस्त्यांवर दिवे फारच कमी तेवत असत. शत्रू शहराच्या दाराशीं भिडू पहात होता.

अशा एका रात्रीं झोया आणि तिची आई दोघी शहरांत सहज सहल करायला गेल्या होत्या. झोयानें जातां जातां रस्त्यावर एका दिव्याच्या प्रकाशांत काळोखाच्या पार्श्वभूमीवर उठून दिसणारें एक दृश्य पाहिलें.

तें एक भव्य भिंतचित्र होतें.

चित्रांत तो निग्रही तरुण सैनिक मर्मभेदी नजरेनें पहात उभा होता. आणि तो पाहणाराशीं बोलतही होता. विचारीत होता, "आघाडीसाठीं तुम्हीं काय केलें आहे ?"

चित्राखालीं ठळक अक्षरांत तें वाक्य छापलेलें होतें.

झोयानें तें पाहिलें, वाचलें आणि गुंगल्यासारखी होऊन त्याच्याकडे टक लावून पाहत रस्त्यांतच ती उभी राहिली.

"मला इथून जाऊं नयेसें वाटतें आई !" ती आईला म्हणाली, "काय ग उत्तर देऊं मी या तरुण सैनिकाला ? आघाडीसाठीं काय केलें आहे मी ?"

"अग, तूं अजून लहान आहेस झोया ! तूं कामगार-आघाडीवर काम केलें नाहींस का ? तें तरी देशासाठीं, सैन्यासाठींच चाललेलें काम नव्हे का ?" आई म्हणाली.

"तें पुरेसें नाहीं आई !" असें म्हणून तिनें आईच्या गळ्याला मिठी मारली. ती म्हणाली, "आई ! मी किती नशिबवान आहें ग ? जें जें मनांत आणावें तें तें हात जोडून पुढें उभें-मग सांगेन तुला माझ्या मनांतलें रात्रीं."

त्या रात्रीं घरीं आल्यावर ती आईला म्हणाली, "आई ! नर्सिंग शिकायला जायचें माझ्या मनांत आहे."

"आणि कारखान्यांत टर्नरचें काम शिकतेस ती ? तें काम अर्धवट सोडून कारखाना जाऊं देईल तुला ?"

"हो ! जाऊं देतील कीं ! आघाडीवरचें काम कारखान्यांतील कामापेक्षां केव्हांही महत्त्वाचें आणि अधिक निकडीचें नाहीं का ग ?"

आई नको म्हणाली नाहीं. आघाडीवर जिवाला धोका असतो हें तिला माहीत होतें. पण तिला नेहमींच वाटायचें—आपल्या सैनिकांसाठीं, आपल्या देशासाठीं केवढाही मोठा धोका असला तरी तो पत्करून पुढें पाऊल टाकायलाच हवें. मग कांहीं का होईना !

दोन दिवसांत झोयानें आघाडीवर जाण्याच्या परवान्याची सारी तयारी केली. आतां उद्यां निघायचें.

"आई कुणाला हें सांगायचें नाहीं बरें का ! अगदीं गुपित ठेवायचें. शत्रूच्या पिछाडीला गनिमी काव्यानें काम करायला जातें आहें मी. कुणालाच म्हणजे शुराला देखील सांगायचें नाहीं. कुणीं विचारलें तर झोया आजोबांना भेटायला खेड्यावर आस्पेनवुडला गेली आहे असें सांग." झोया आईला सांगत होती.

"पण पोरी ! तुला असली जोखमाची कामगिरी करायला परवानगी तरी कशी मिळाली ?" आईनें विचारलें.

"सांगत्यें. पण तें कुणाला सांगायचें मात्र नाहीं हं ! शुराला देखील. हें बघ, मीं कॉमसोमॉलच्या जिल्हा समितीकडे अर्ज केला होता. मला आघाडीवर जायचें आहे असें अर्जांत लिहिलें होतें. असे किती अर्ज आले आहेत समितीकडे सांगूं तुला ? हजारांनीं आले आहेत. मला त्यांनीं मुलाखतीला बोलावलें तेव्हां सांगितलें. आणि मॉस्कोच्या कॉमसोमॉल समितीकडे मला पाठविलें."

" आणि मग ? "

" मग काय ? मी मॉस्को समितीच्या कचेरींत गेल्यें. चिटणिसाच्या कचेरीचा दरवाजा उघडून आंत गेल्यें, तेव्हां तो गृहस्थ थोडा वेळ माझ्याकडे नुसता टक लावून पाहत होता. मलाही तेव्हां जरा भयच वाटलें. पण किती ? अगदीं थोडा वेळ. मग मात्र कांहीं नाहीं. त्यानें मग मला माझा सर्व इतिहास विचारला. मी कुठची ? माझे आईबाप कोण ? मीं प्रवास केला आहे का ? कुठें कुठें ? कोणते जिल्हे मला माहीत आहेत ? मला कोणकोणत्या भाषा येतात ? असें सगळें सगळें त्यानें विचारून घेतलें."

" अग बाई ! इतकें का विचारतात ? "

" ऐक तरी. एवढ्यावरच झालें नाहीं. मग त्यानें माझे पाय कसे आहेत, हृदय कसें आहे, मला ताकद कितपत आहे, हेंही विचारलें. निरनिराळ्या स्थळांविषयीं माहिती विचारली. आकाशांतील ताऱ्यांविषयीं विचारलें. मीं त्या सर्व प्रश्नांचीं ठाकठीक उत्तरें दिलीं. मग मला विचारलें त्यानें, 'रायफल तुला माहीत आहे ?' मीं म्हटलें, 'आहे माहीत.' 'तुला नेम धरतां येतो ?' 'येतो.' 'खोल पाण्यांत बुडी मारायचें भय तुला वाटत नाहीं ?' 'नाहीं वाटत !' 'पॅराशूटच्या मनोऱ्यावरून उडी घेतांना तूं भीत नाहींस ?' 'नाहीं भीत.' 'बरें, तुझी इच्छाशक्ति प्रभावी आहे का ?' त्यावर मी म्हणाल्यें, 'माझे स्नायु अगदीं मजबूत आहेत.' आणि मी गप्प राहिल्यें."

"झालें ?"

"नाहीं झालें. ऐक, तो माणूस मग मला म्हणतो कसा कीं 'सध्यां युद्ध सुरू आहे. आम्हांला माणसें हवीं आहेत. तुला आम्हीं आघाडीवर पाठवलें तर?'' मी म्हटलें, 'फारच चांगलें. मी आनंदानें जाईन कीं !' त्यावर तो म्हणतो कसा, 'कचेरींत बसण्यासारखें बैठें सोपें काम नव्हे तें, गप्पा मारीत बसायचें. बरें, मला आतां असें सांग, हवाई हल्ला झाला तर तूं कुठें राहतेस ?' त्यावर मी सांगितलें, 'मी घराच्या छपरावर उभी असत्यें. मला हवाई हल्ल्याच्या इषाऱ्यांचें भय वाटत नाहीं. बाँबवर्षावाची मला मुळींच भीति वाटत नाहीं. खरें म्हणजे मला कशाचीच भीति वाटत नाहीं.' तेव्हां त्याचें समाधान झालें. तो मग मला म्हणाला, 'ठीक आहे. तूं बाहेर व्हरांड्यांत थांब जरा. मला दुसऱ्या एका कॉम्रेडशीं कांहीं बोलायचें आहे. तेवढें आटोपून आपण तुशिनो विमानतळावर जाऊं. तुला मी विमानांतून कांहीं उड्या घ्यायला सांगणार आहें."

"म्हणजे मोठें दिव्यच आहे कीं ग हें झोया !"

"तर ! मी मग व्हरांड्यांत जाऊन थांबल्यें. डोक्यांत विमानांतून उड्या मारतांना कसें होईल या विचारांनीं गडबड चालविली होती. मी मनाला धीर देत होत्यें— 'दचकायचें नाहीं.' तोंच अंमळशानें तो अधिकारी व्हरांड्यांत आला. त्यानें मला विचारलें. 'हुश्शार ?' मी म्हटलें, 'हुश्शार.' मग तो मला उगीचच भिववूं लागला. म्हणाला कीं आघाडीवरची परिस्थिति फार बिकट असते. तिथें

केव्हां काय घडेल याचा नेम नसतो. तूं घरीं जा, आणि याचा पुन्हा नीट विचार कर. आणखी दोन दिवसांनीं सांगायला ये. तेव्हां मला समजलें कीं, पॅराशूटमधून उड्या घेण्याचें त्यानें सांगितलें, तें केवळ माझी मनाची तयारी पाहण्यासाठीं. नंतर दोन दिवसांनीं मी पुन्हा त्या कचेरींत गेल्यें. मला बघतांक्षणीं तो एकदम सांगून मोकळा झाला कीं, तुला प्रवेश द्यायचा नाहीं असें ठरलें आहे.

"मला मग मात्र राग आला. मीं विचारलें, 'म्हणजे ? कां म्हणून प्रवेश नाहीं द्यायचा मला ?'

"तेव्हां तो हंसत मला म्हणाला, 'बैस खालीं. तुला आम्हीं शत्रूच्या पिछाडीला पाठवायचें ठरवलें आहे. तेव्हां मीं ताडलें कीं ही देखील मला भेडसावण्याची एक शक्कल आहे. तेव्हां जर मी हायसा उसासा सोडला असता, किंवा तशी कांहीं भित्री चुळबुळ केली असती ना, तर साराच कारभार आटोपला असता. पण निभावलें. बस्स. झालें काम. माझी पहिली चांचणी परीक्षा संपली. मी उत्तीर्ण झाल्यें."

त्या दिवशीं सारा दिवसभर झोयाची आवरा-आवर आणि युद्धाच्या कामगिरीवर जाण्याची तयारी चालली होती.

रात्रीं बरीच रात्रपावेतों आई आणि लेकरें युद्धा-च्याच गोष्टी बोलत होतीं. मध्यरात्र झाली तेव्हां तीं झोपीं गेलीं.

पहांटेला झोयाला वेळींच आपोआप जाग आली.

शुराही कारखान्यांत कामावर जाण्यासाठीं नेहमीं-प्रमाणें लौकर उठला.

"नमस्ते शुरा ! येत्यें मी." झोया भावाला म्हणाली.

"आजोबांना माझा नमस्कार सांग." शुरा तिच्याशीं हस्तांदोलन करीत म्हणाला. आईनें त्याला सांगितलें होतें तें त्याला माहीत, कीं झोया खेड्यावर आजोबांना भेटायला जाते आहे.

झोया आस्पेनवुड गांवाकडे चालली होती. तिथेंच तिचें आजोळ होतें. आणि तिकडेच तिला कामगिरीवर जायचें होतें.

झोया तें ऐकून हंसत म्हणाली, "बरें आहे."

नंतर चहा-फराळ झाला. आईनें लेकीच्या सामाना-च्या पिशवींत स्वतःचा लोकरीचा जंपर घातला.

"अग नको मला ! हिंवाळ्यांत तुझें नाहीं का अड-णार ? गरम कांहींतरी हिंवाळ्यांत तुला हवें ना !" झोया म्हणाली. पण आईनें तें ऐकलें नाहीं. तिनेंही मग अधिक आढेवेढे घेतले नाहींत.

ती निघाली.

"दे इकडे ती पिशवी, मी घेत्यें." आई म्हणाली.

झोया उभी राहून मागें वळून पाहते तों—

"हें ग काय आई ? रडतेस कां तूं अशी ? असें आंसूं भरल्या नजरेनें माझ्याकडे पाहूं नकोस बघ. रडायचें नाहीं. पाहा बरें पुन्हा माझ्याकडे एकदां."

आई अश्रू आंतल्याआंत दाबीत जेव्हां हंसतमुखानें पाहूं लागली, तेव्हां झोयाला बरें वाटलें.

तेवढ्यांत ट्राम आली. झोया आंत चढली. ट्राम पुढें निघून गेली.

## ३ : 'प्रावदां'तील तान्याची कहाणी

झोया आघाडीवर गेली, त्या दिवसापासून आई आणि शुरा यांना घर अगदीं ओकें ओकें भासूं लागलें.

पूर्वीं कधीं शुरा घरीं आला, आणि झोया कुठें बाहेर गेली असली, तर तो आईला विचारायचा, "आई ! झोया कुठें गेली ग ?"

आतां तो रोज आला, कीं विचारायचा, "कांहीं बातमी ?"

आईला त्या प्रश्नाचा अर्थ कळत होता. पुढें पुढें तर तो तिला प्रश्न विचारीनासाच झाला. तरी त्याच्या नजरेंत तो केविलवाणा प्रश्न तरळतांना तिला रोज दिसायचा.

एके दिवशीं तो इतक्या ओसंडत्या उत्साहानें आंत आला कीं आईनें ओळखलेंच—बहुतेक झोयाचें पत्र आलें असलें पाहिजे.

खरेंच पत्रच आलें होतें. शुरा तें आईला वाचून दाखवूं लागला.

"आई ! तूं कशी आहेस ? तुझी प्रकृति कशी आहे ? खुशाल आहेस ना ? हें बघ आई ! सवडींत सवड काढून मला चार ओळी लिहीत जा. मी माझ्या कामगिरीवरून माघारी आल्यें ना, कीं नक्की तुला भेटायला येईन. ...तुझी लाडकी झोया."

"किती तारखेचें पत्र आहे रे तें ?" आईनें विचारलें.

"१७ नोव्हेंबरचें. त्यावरून वाटतें कीं झोया आतां लौकरच येऊन आपणाला भेटणार. नाहीं आई ?" शुरा म्हणाला.

त्या दिवसापासून तीं मायलेकरें एकेक दिवस मोजूं लागलीं. आतां त्यांना हुरहुर वाटत नव्हती. आनंद आणि आशा यांची गोड ओढ मात्र त्यांच्या अंतःकरणाला लागून राहिली होती. जरा खुट् झालें, दरवाजा वाजला, कीं मिनिटामिनिटाला त्यांना वाटायचें, झोया तर आली नाहीं ना ? कारण ती आतां नक्की येणार होती. ती कोणत्याही क्षणीं येणें शक्य होतें.

पण नोव्हेंबर गेला. डिसेंबर गेला. जानेवारी महिना संपत आला. तरी झोया येईना. तिचें पत्र देखील येईना.

जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यांत एके दिवशीं आई अंमळ उशिरां घरीं आली. माणसाचें मन हळवें झालें असलें कीं कोण काय बोलतें, याचा सहज रस्त्यानें येतांना माणसाला कानोसा घ्यावासा वाटतो. तसेंच आज तिचें झालें होतें.

त्या दिवशीं रस्त्यांत कुणीतरी कुणाशीं तरी बोलतांना तिनें ऐकलें होतें.

"आजच्या 'प्रावदा' मधला लिडोव्हचा लेख वाचलात का ?"

कांहीं क्षणांनीं ट्राममध्यें एका बाईला तसेंच कांहीं बोलतांना तिनें ऐकलें.

"अंतःकरणाचा तळठाव घेणारा लेख आहे अगदीं. धन्य त्या मुलीची..."

त्यावरून आईला वाटत होतें कीं, आजच्या वृत्तपत्रांत कांहींतरी विशेष बातमी आली असली पाहिजे. तो विचार मनांत घोळवीत ती त्या रात्रीं अंमळ उशिरां घरीं आली.

घरीं येतांच तिनें शुराला हांक मारली.

"आजचा 'प्रावदा'चा अंक तूं वाचलास का रे, शुरा ? म्हणतात कीं फार चांगला वाचण्याजोगा लेख आला आहे आजच्या अंकांत." ती म्हणाली.

"होय. आला आहे खरा."

"कशाबद्दल आहे तो ?"

"तान्या नांवाच्या आपल्या एका तरुण मुलीविषयीं-चा लेख आहे तो. तिला जर्मनांनीं फांशीं दिली ग !"

"अरेरे ! कुणा आईचें लेकरूं होतें तें नकळे. तिची आई अशीच बिचारी ती केव्हां येऊन भेटते याची वाट पहात बसली असेल. बिचारी काळजी करीत असेल." ती हळहळत उद्‌गारली.

तों रेडिओवर आघाडीवरच्या बातम्या येण्याची वेळ झाली. तिनें बटन दाबून रेडिओ सुरू केला.

"...आतां आम्ही तारीख २७ जानेवारीच्या 'प्रावदा'-च्या अंकांत प्रसिद्ध झालेला लिडोव्ह यांचा "तान्या" हा लेख नभोवाणीवरून प्रक्षेपित करीत आहों." दुःखानें व संतापानें भारावलेला आवाज रेडिओवरून ऐकूं येऊं लागला. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यांत पेट्रिचेव्हो

गांवीं जर्मनांनीं तान्या नांवाच्या एका रशियन तरुण स्वयंसेविकेला कसें हाल हाल करून ठार केलें, ती हृदयद्रावक कहाणी त्या लेखांत कथन करण्यांत आली होती.

"आई ! मी रेडिओ बंद करूं का ग ?" शुरा जरा वेळ ऐकून आईला म्हणाला. कारण त्याला झोंपायचें होतें. दुसऱ्या दिवशीं सकाळींच कारखान्यांतलें रोजचें काम त्याच्यामागें होतें.

"आवाज जरा बारीक कर. आणि जा तूं झोपायला. दार लावून घे." आई म्हणाली.

शुरा रेडिओचा आवाज बारीक करून आपल्या खोलींत झोंपायला गेला.

रेडिओ तान्याची कहाणी सांगत होता.

...तान्याला आंत नेण्यांत आलें. एका बांकावर तिला बसायला सांगण्यांत आलें. तिच्या समोर मेजावर दोन टेलिफोन होते. एक टाइपरायटर होता. रेडिओ होता. आणि लष्करी कामकाजाच्या कागदांचें मोकळें पुडकें होतें.

अधिकाऱ्यांमागून अधिकारी आंत येऊं लागले. घरमालक व्होरोनिन यांना व सर्व मंडळींना घराबाहेर जायला सांगण्यांत आलें. एक म्हातारी तिथेंच रेंगाळत असलेली पाहून एका अधिकाऱ्यानें तिला दरडावणीच्या भाषेंत बाहेर चालतें व्हायला, पाठीवर एक रट्टा लगावून, सांगितलें.

नंबर १९७ तुकडींतील ३३२ व्या पायदळाचा कमांडिंग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल रुडेरर स्वतः प्रश्न विचारूं लागला.

घरचीं माणसें आपल्या स्वयंपाकघरांतून त्या खोलींत चाललेलें संभाषण चांगलें ऐकूं शकत होतीं. अधिकारी प्रश्न विचारीत होता. तान्या त्याला बेदरकारपणें खणखणीत उत्तरें देत होती.

"तुझें नांव काय ?"

"तें मी तुला सांगणार नाहीं."

"तबेल्यांना आग लावणारी तूंच का ?"

"होय. मीच."

"त्यांत तुझा हेतु काय होता ?"

"तुमचा सत्यानाश करण्याचा."

"नीट बोल. तूं आघाडी कधीं ओलांडलीस ?"

"शुक्रवारीं."

"तर मग तूं फार लौकर इथें येऊन पोचलीस म्हणायची."

"मी उगीच वेळ कां म्हणून वायां दवडावा ?"

नंतर, तुला इकडे कोणीं पाठवलें, तुझ्याबरोबर आणखी कोण कोण होते, वगैरे माहिती त्यांनीं तान्याला विचारली. त्यांना तिचीं सडेतोड उत्तरें... "नाहीं !" "मला माहीत नाहीं." "मी सांगणार नाहीं."

नंतर आसुडांच्या फटक्यांचा आवाज हवेंत उमटलेला ऐकूं येऊं लागला. ते फटके तिच्या उघडया अंगाचें मांस घांसाघांसानें चावून खात होते.

कांहीं मिनिटांनीं एक तरुण अधिकारी धडपडत स्वयंपाकघरांत आला. आणि दोन्ही हातांनीं डोकें घट्ट धरून पटकन खालीं बसला. आंतील प्रश्न विचारणें संपेतों तो तसाच डोळे घट्ट मिटून आणि कानांत बोटें घालून खालीं मान घालून बसला होता. पाषाणहृदयी फासिस्टांना देखील सहन न होण्याइतका तो भयंकर प्रकार होता.

चार दांडगेश्वरांनीं आपले कमरपट्टे सोडून घेतले. आणि त्या पट्टयांनीं ते त्या मुलीला झोडपूं लागले. स्वयंपाकघरांतील घरमालकानें आंतून दोनशें फटके मोजले. परंतु तान्याच्या मुखांतून ब्रही निघाला नाहीं. नंतर ती पुन्हा पूर्वींइतक्याच आवेशानें पण क्षीण स्वरांत उद्गारली, "नाहीं, मी कांहीं सांगणार नाहीं."

तान्याला विश्वासघातानें कबुलीजबाब देणें माहीत नव्हतें. मारानें आणि थंडीनें तिचें सारें शरीर काळें निळें झालें. जखमांतून रक्त भळभळ वहात होतें. तरी देखील ती कांहींही बोलत नव्हती. तिला त्या घरांत अशा छळवादांत दोन तास पावेतों डांबून ठेवली होती. नंतर तिला प्रश्न विचारण्यासाठीं व्हॅसिली कुलिकच्या घरीं अनवाणी उघडें वाघडें असें बर्फांतून फरफटत नेण्यांत आलें.

तेव्हां तिच्या भालप्रदेशावर सांखळत्या रक्ताचा पापुद्रा धरलेला भला मोठा चट्टा होता. तिच्या हातांपायांवर जखमा होत्या. तिला श्वास घेतांना आणि सोडतांना फार कष्ट पडत होते. तिचे केंस अस्ताव्यस्त पिंजारलेले होते.

कुरळचा केसांच्या बटा घामामुळें तिच्या भरदार भुवयांना चिकटल्या होत्या. तिचे दोन्हो हात पाठीमागें आंवळून बांधलेले होते. ओठ रक्ताळून सुजले होते. तिच्याकडून कबुलीजबाब घेण्यासाठीं जर्मन फासिस्टांनीं तिचे हाल-हाल चालविले, तेव्हां तिनें सहनशक्ति एकवटण्यासाठीं ओठ जोरानें चावले असावेत.

ती एका बांकावर खालीं मान घालून शांत व स्तब्ध बसली होती. तिच्या खोलीच्या दरवाजावर एक सशस्त्र जर्मन पहारेकरी पहारा करीत होता.

"मला थोडें पाणी प्यायला द्या." ती म्हणाली. व्हॅसिली कुलिक लगेच उठला आणि पाण्याच्या पिंपांतलें पाणी आणायला गेला. तेवढ्यांत पहारेकऱ्यानें त्याला मागें ओढलें आणि टेबलावरचा रॉकेल तेलाचा दिवा उचलून तिच्यापुढें धरला. 'तुला पाणी प्यायला मिळणार नाहीं, रॉकेल तेल प्यायला मिळेल,' हें तिला त्या पहारे-कऱ्यानें सूचित केलें.

कुलिक त्या मुलीच्या बाजूनें रदबदली करूं लागला. प्रथम पहारेकरी त्याच्यावरहि खेंकसला, पण मागाहून त्यानें परवानगी दिली. ती दोन भांडीं पाणी घटाघट प्याली.

जर्मन शिपायांनीं त्या मुलीला वेढा घातला आणि तिची टिंगल करीत आपली मनसोक्त करमणूक करून घेतली. कांहींनीं तिच्या दोन्ही कुशींत बुक्क्या मारल्या. एकानें तर तिच्या पाठीवरून करवत ओढायलाहि कमी केलें नाहीं.

त्या त्यांच्या पाशवी वासनेची तृप्ति झाल्यावर ते शिपाई झोंपीं गेले. लगेच एका पहारेकऱ्यानें आपली बंदूक रोखून तान्याला घराबाहेर पडायला फर्माविलें. बागनेटाचें टोंक तिच्या पाठीला भिडवून तो तिला त्या भयाण रात्रीं बर्फांतून अनवाणी वणवण हिंडवीत होता. पुढें त्यालाच जेव्हां बर्फाच्या गारठ्याचा त्रास होऊं लागला, तेव्हां तो तान्याला घरांत खेंचोत घेऊन माघारा आला.

नंतर दुसरा पहारेकरी त्याच्या जागीं आला. त्यानें मात्र तान्याला बांकावर कलंडण्याला परवानगी दिली. सकाळीं उजाडतांच शिपाई तान्याला फांशीं देण्याची तयारी करूं लागले. त्यांनीं तिचे कपडे आणविले. तिचा ब्लाउझ, विजार आणि पायमोजे, तसेंच तिची सामानाची पिशवीही आणली. तिची हॅट, लोंकरीचें जाकीट, मऊमऊ लोंकरीचा जंपर आणि बूट जर्मन शिपायांनीं चोरून नेले होते, आणि त्यांची आपसांत वांटणी करून घेतली होती.

त्यांनीं मग तान्याला कपडे घालायला सांगितलें. घरमालकानें मारामुळें काळचा निळचा झालेल्या तिच्या पायांत पायमोजे चढवायला मदत केली. जर्मन शिपायांनीं तिच्या छातीवर तिच्या पिशवींतल्या बेंझिनच्या बाटल्या बांधल्या आणि एक पाटी तयार करून ती तिच्या गळ्यांत अडकविली. त्या पाटीवर 'घरें जाळणारी' असें लिहिलें होतें. तशीच तिला त्यांनीं फांशीच्या खांबाकडे चालवीत नेली. गांवांतील लोकांना मुद्दाम तो फांशीचा सोहाळा पाहण्यासाठीं बोलविण्यांत आलें. कांहीं थोडे लोक भीतीनें आले;

पण तेही तो भयंकर प्रकार पाहवेना तेव्हां मुकाटपणें अंग चोरीत चालते झाले.

फांसाच्या दोरीखालीं एकावर एक दोन देवदारी खोकीं मांडलीं होतीं. फांशीं देणाऱ्या शिपायानें तान्याला त्या खोक्यांवर चढविलें, आणि फांसाची दोरी तिच्या गळ्यांत अडकविली. एक जर्मन अधिकारी छायाचित्र घेण्यासाठीं कॅमेरा उभारून उभा होता. त्याला तें घेण्यासाठीं थोडा वेळ मिळाला. तेवढ्याचा तान्यानें पुरेपूर उपयोग करून घेतला. सभोंवार जमलेल्या आपल्या सामुदायिक शेतांवरील शेतकरी बांधवांना हांक मारून ती म्हणाली, "भाई हो, तुम्ही असे दुःखी कष्टी कां दिसतां? शूर व्हा! लढा! फासिस्टांना जाळून, भाजून त्यांचा नायनाट करा! मी मरणाला भीत नाहीं. भाई हो, आपल्या लोकांसाठीं मरणें ही मोठी भाग्याची गोष्ट आहे." तशीच ती शेजारीं उभ्या असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे व जर्मन शिपायांकडे पाहून ओरडली, "तुम्हीं मला आत्तां फांशीं द्याल. पण याद राखा, मी एकटी नाहीं. असे माझ्यासारखे आणखी वीस कोटि बहाद्दर आहेत. त्या सर्वांना कांहीं तुम्हीं फांसावर चढवूं शकणार नाहीं. माझ्या मृत्यूचा पुरेपूर बदला घेतला जाईल. अरे बाबांनो, अजून वेळ गेलो नाहीं तोंवर शरण या, आणि स्वतःचे जीव वांचवा. कारण अंतिम जय आमच्याच ठेवलेला आहे."

तोंच फांशीं देणाऱ्या शिपायानें फांसाच्या दोरीची सरकगांठ ओढून तान्याच्या गळ्यासभोंवारचा फांस घट्ट

केला. तान्या आपल्या दोन्ही हातांनीं तो फांस हळूहळू हिसकीत आपल्या पायाच्या पंजावर उभी राहून उद्गारली—"येतें आतां. भाई हो, भिऊं नका. स्टालिन आपल्या बरोबर आहे."

तोंच फांशी देणाऱ्या शिपायानें बुटाच्या एका ठोकरीसरसें तिच्या पायाखालील देवदारी खोकें बाजूला ढकललें. त्याबरोबर तान्या फांसावर लटकली गेली.

## ४ : ती झोयाच होती !

दुसऱ्या दिवशीं सकाळीं झोयाची आई कॉम्सोमॉल जिल्हा समितीच्या कचेरींत झोयाची चवकशी करण्याकरितां गेली.

समितीचा चिटणीस तिला म्हणाला, "बाई ! तुमची मुलगी फार मोठ्या जबाबदारीच्या कामगिरीवर गेली आहे. तिकडून पत्र यायला साहजिकपणें वेळ लागणारच. कांहीं काळजी करूं नका."

बिचारी आई त्या आशेवर घरीं गेली.

असे आणखी कांहीं दिवस गेले. आई लेकीसाठीं मनांत एकसारखी झुरत होती. अखेर फेब्रुवारीच्या ७ तारखेला ती बाहेरून घरीं येऊन पहाते तों शुरानें लिहिलेली दोन ओळींची चिट्ठी तिला टेबलावर मिळाली.

**"आई ! कॉम्सोमॉल जिल्हा समितीच्या चिटणिसांनीं तुला भेटायला बोलावलें आहे."**

आई तशीच आपल्या पाडसाच्या ओढीनें समितीच्या कचेरींत धांवत गेली. समितीच्या चिटणीसांनीं नम्र पण गंभीर गहिंवरल्या कंठानें तिला सांगितलें, "बाई, आपण माघाऱ्या जा. मॉस्को कॉम्सोमॉल समितीचे सदस्य तुम्हांला भेटायला तुमच्या घरीं गेले आहेत."

त्यासरशा आईच्या आशा एकदम जोरानें पालवल्या. ती तशीच घाईघाईनें धांवत घरीं गेली. पहाते तों समितीचे दोन अधिकारी बसले होते. शुरा त्यांच्या शेजारीं उदासवाणी भकास चर्या करून खिडकींत उभा होता. आईनें लेकाच्या नजरेला नजर भिडविली. त्याबरोबर शुरानें कळवळून धांवत येऊन "आई !" अशी आर्त हांक मारीत तिच्या गळयाला मिठी मारली.

"बाई ! 'प्रावदांत' तान्या म्हणून मुलीची जी कहाणी प्रसिद्ध झाली ती तुमच्या झोयाचीच कहाणी आहे. आपण एकदोन दिवसांत त्या खेडेगांवीं जाऊं."

ते अधिकारी गंभीरपणें भारावलेल्या अंतःकरणानें तिला अभिवादन करून निघून गेले.

फेब्रुवारीच्या १३ तारखेला झोयाची आई तिचें शांतवन करण्यासाठीं आलेल्या त्या दोन अधिकाऱ्यां-बरोबर पेट्रिशेवो गांवीं गेली. तिला, बाहेर थंडी फार होती म्हणून त्या अधिकाऱ्यांनीं थोडा वेळ, जवळच्या झोंपडींत नेऊन बसविलें. आणि नंतर ते तिला घेऊन झोयाच्या कबरीपाशीं गेले. एवढया वेळांत कबर उघडली गेली होती. मानेला दोरीचा फांस घट्ट आंवळलेला आहे,

मस्तक मागें झुकलेलें आहे, दोन्ही हात दोन बाजूंना उभे टेकले आहेत, असें आपल्या मुलीचें कलेवर झोयाच्या आईला दिसलें. तिला भयंकर मारहाण झाली होती. त्याच्या कितीतरी जखमा शरिरावर ठिकठिकाणीं सांकळलेल्या दिसत होत्या. तिचे ओठ सुजून काळे निळे पडलेले होते. शरिरावर ठिकठिकाणीं बागनेटें भोसकलेल्या वाळक्या जखमा होत्या.

आईनें लेकीच्या शवापुढें गुढगे टेकले आणि त्या पोटच्या गोळ्याची आठवण म्हणून तिच्या भुंवईचा एक केंस काढून घेतला. तेवढ्यांत लाल सेनेंतील एक तरुणी तिच्यापाशीं आली आणि तिला म्हणाली, "आई, चला आपण थोडा वेळ पलीकडे त्या झोंपडींत जाऊन बसूं."

"मी येत नाहीं." आई म्हणाली.

"मी कोणी परकी नाहीं आई ! झोयाच्या तुकडींतील आहें एक मी. आपल्या झोयाविषयीं मी तुम्हांला सगळें कांहीं सांगत्यें, चला."

तेव्हां कुठें आई त्या मुलीबरोबर गेली. दोघीही झोंपडींत जाऊन बसल्या. झोंपडी मोकळीच होती.

"माझें नांव क्लाव्हा. आम्ही साऱ्याजणी एकदमच माघाऱ्या यायच्या. पण झोया एकटी मागें राहिली. ती कांहीं केल्या येईचना. तिला वाटे, आपल्या हातून खरें कांहींच काम झालें नाहीं. म्हणून तिनें गट-अधिकाऱ्याकडून

( ग्रुप कमाण्डर ) पेट्रिशेवो गांवांत आणखी दूरवर जाण्याची परवानगी मिळविली. तिथें जर्मन शिपाई जीं घरें बळकावून रहात होते त्या घरांना तिनें आगी लावल्या. जवळचा एक मोठा लष्करी तबेलाहि पेटवून दिला. दुसऱ्या दिवशीं दोनशें घोडे असलेला आणखी एक लष्करी तबेला ती पेटविणार होती. तिच्या हातांत तेव्हां बेंझिनची बाटली व आगपेटी होती. तेवढ्यांत जर्मन शिपाई धांवून आले. त्यांनीं तिला पकडलें...."

क्लाव्हाच्या तोंडून पुढें शब्दच उमटेना. ती हुंदके देऊं लागली. ती घटना झोयाच्या आईला परमावधीचें दुःख देणारी तर खरीच. परंतु तितकाच तिला अभिमान व धन्यता वाटत होती कीं, झोयासारखी मुलगी आपल्या कुशींत जन्माला आली.

* * *

मार्चच्या पहिल्या तारखेला सकाळींच झोयाची आई झोयाला सरकारनें आदरपूर्वक देऊं केलेलें सन्मानपत्र स्वीकारण्यासाठीं मॉस्कोला गेली. तेव्हां शुराहि तिच्या-बरोबर होता. तिनें सभोंवार क्रेमलिनवर आणि लाल चौकावर नजर टाकीत शुरापाशीं आपलें अंतःकरण मोकळें केलें. ती म्हणाली, "माझी झोया हें वैभव पहायला नाहीं. तिला वसंत ऋतु फार आवडे. लाल चौकावर तिचें फार प्रेम. परंतु ती आपणाला सोडून गेली. ती आतां या लाल चौकांत आपणाला पुन्हां दिसणार नाहीं."

झोयाच्या आईला तिथें फार वेळ वाट पहात थांबावें लागलें नाहीं. एक अधिकारी तिला लगेच आंत एका प्रशस्त दालनांत घेऊन गेला. तिला पाहतांच तिथें खुर्चीवर बसलेला एक गृहस्थ चटकन उठून उभा राहिला. तिनें त्याला पाहतांक्षणीं ओळखलें. आणि तो स्वतःशीं उद्गारली—“आं ! हे तर मिखेल इव्हानोविच कालीनीन.” रशियाच्या सुप्रीम सोव्हिएटचे अध्यक्ष कालीनोन तिला नम्रतापूर्वक सामोरे गेले. त्यांनीं त्या माउलीचें हस्तांदोलनपूर्वक अभिनंदन केलें. आणि ‘हीरो ऑफ सोव्हिएट यूनियन’ (सोव्हिएट यूनियनची नायिका) या सर्वोच्च सन्मानपत्राचा करंडक तिच्या हातीं देऊन म्हटलें, “बाई, तुमच्या थोरांतल्या थोर मुलीची आणि तिनें आपल्या देशासाठीं केलेल्या असाधारण आत्मयज्ञाची आपल्या राष्ट्राच्या वतीनें ही कृतज्ञतापूर्वक आठवण.”

एक महिन्यानंतर झोयाचें शव मॉस्कोला आणण्यांत आलें. आणि नोव्हादवीची स्मशानभूमींत त्या शवाला सन्मानपूर्वक मूठमाती देण्यांत आली. तिच्या कबरेवर स्मारक उभारण्यांत आलें आहे. त्या पाषाणावर झोयाचें पुढील ब्रीदवाक्य खोदलेलें आहे :

“जोवन ही माणसाची सर्वांत आवडती संपदा आहे. माणसाला एकदांच जीवन जगतां येतें. तें त्यानें असें जगावें कीं हें जग सोडून जातांना त्याला अभिमानानें म्हणतां यावें, माझें सर्व आयुष्य, माझें सर्व सामर्थ्य मी जगांतील सर्वोत्कृष्ट कार्यासाठीं—मानवाच्या मुक्तीसाठीं सत्कारणीं लावलें आहे.”

★

BVBK-0401236

आवाप्ति
९२३६ दि. 20।५।८७
बा.वा.

# कांहीं तरी नवेंच करा

जीवनाची ठराविक चाकोरी सोडून—'कांहीं तरी नवेंच' करण्याची ईर्षा बाळगली आणि तत्सिद्ध्यर्थ विशिष्ट जीवनक्षेत्रांत अलौकिक कर्तृत्व केलें अशांची चरित्रें.

तीस मिनिटांत वाचून होणारीं पुस्तकें : शालेय-वर्गग्रंथालयासाठीं योजना

१. असा असतो देशभक्त : कोतवाल
२. गुलाम बंड करतो : स्पार्टकस
३. रा. शिक्षणाचा ध्यास : विजापूरकर
४. कादंबरीकार हरीभाऊ : आपटे
५. मराठी नटसम्राट : गण. जोशी
६. व्यायाम भीष्माचार्य : माणिकराव
७. लष्करी संघटक : क. लॉरेन्स
८. अलौकिक शिल्पकार : एंजलो
९. चित्रपट महर्षि : दादासाहेब फाळके
१०. इतिहासाचार्य राजवाडे : राजवाडे
११. बंदीजनांची माउली : फाय
१२. देशासाठीं दर्यापार : जेम्स कुक
१३. वीरबाला झोया : ( रशिया )
१४. बहादूर शिकारी : जिम कॉर्बेट
१५. कोई बी चीज उठाव : वुलवर्थ
१६. वीरपत्नी राणी दुर्गावती :
१७. विख्यात वकील : बॅ. जयकर
१८. विलक्षण वार्ताहर : अर्नेस्ट पाइल
१९. भारतीय चित्रकार : रविवर्मा
२०. मराठी मुद्रण-प्राणदाता : जावजी
२१. राजमाता जीजाबाई
२२. स्वदेशी कारखानदार : अंताजी काळे
२३. भव्य स्थापत्य : फर्डिनांड द लेसेप्स
२४. सर्कसबहाद्दर : विष्णुपंत छत्रे
२५. भक्तिवेडी बहिणा : बहिणाबाई
२६. सद्‌गुणी बनण्याची कला : फ्रँकलिन
२७. भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ
२८. कोशकार केतकर : डॉ. केतकर
२९. कृषिपंडित : दादासाहेब शेंबेकर
३०. खरा खेळाडू : पी. बाळू
३१. चिरंजीव मरण : मदनलाल धिंग्रा
३२. विमामहर्षि : अण्णासाहेब चिरमुले
३३. तेजस्वी धर्मोद्धारक : शंकराचार्य
३४. बंडखोर लोककवि : अनंत फंदी
३५. साकार संगीत : पं. पलुस्करबुवा
३६. साहसी वैमानिक : सँटा ड्युमाँ
३७. दरियाचा राजा : कान्होजी आंग्रे
३८. जमिनीचा जादूगार : डॉ. कार्व्हर
३९. लाखांचा प्राणदाता : लुई पाश्चर
४० शिक्षण-भगीरथ : भाऊराव पाटील
४१. मराठी-मुद्रक : गणपत कृष्णाजी
४२. बर्फांतला माणूस : हिलरी
४३. प्राणावरचा प्रवास : शिफले
४४. दानशूर कुबेर : रॉकफेलर
४५. प्रवासी पंडित : ह्युएनत्संग
४६. नृपनिर्माता : आर्य चाणक्य
४७. असामान्य क्रिकेटपटू : ब्रॅडमन
४८. लोकहिताचा संरक्षक : वि. पटेल
४९. पहिला मिशनरी : गजाननराव वैद्य
५०. तुम्हांला कोण व्हावेंसें वाटतें ?

प्रत्येक पुस्तक पन्नास नये पैसे : संच पेटी रु. २५.

वोरा अँण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.